ePaper

# कुदळवाडी येथे भीषण आगीत 6 गोदामे खाक



वर्ष - 6 । अंक - 364 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।मंगळवार दि. 25 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

आतील पानांत

- सोसायट्यांना आमदार निधीतून मदत
- ‘नेमकचि बोला’ कोणती ‘विचारधारा’?
- उष्माघात, निसर्गचक्र आणि पर्यावरणीय संकट

# शिवजयंतीच्या भूखंडासाठी ‘घंटानाद’!

## » ‘पीएमआरडीए’ प्रशासनाचा निर्णय : आयुक्त राहुल माहिवाल यांना निवेदन





।पिंपरी महाईन्यूज । प्रतिनिधी।

**निगडी भक्ती-शक्ती चौक येथील पेठ क्रमांक २४ हा संपूर्ण भूखंड जयंती उत्सावासाठी आरक्षित ठेवावा. हा भूखंड बिल्डरांच्या घशात घालू नये मागणीसाठी विविध संघटनांनी आकुर्डीतील पीएमआरडीएच्या कार्यालयासमोर टाळ व घंटानाद आंदोलन केले.**

याबाबत पीएमआरडीचे आयुक्त राहुल महिवाल यांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, शहरातील भक्ती-शक्ती चौक येथे पीएमआरडीए अखत्यारीत असलेल्या भूखंडापैकी काही क्षेत्राचे नुकतेच वाटप करण्यात आले आहे.

या भूखंडावर अनेक वर्षांपासून अनेक महापुरुषांच्या जयंतीचे / उत्सवांचे कार्यक्रम केले जातात. प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी केली जाते.

तसेच लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जयंती, मोहम्मद पैगंबर जयंती त्याठिकाणी सार्वजनिकरित्या साजरी केली जाऊ शकते. तसेच निगडी गावठाणचा जत्रा महोत्सव, किर्तन सप्ताह, राजकीय ,अध्यात्मिक, साहित्य सभा संमेलने, कामगार मिळावे. सर्व राजकीय पक्षांच्या सभा होण्यासाठी हा भुखंड खुला राहणे शहर विकासासाठी महत्त्वाचे आहे.

इतर वेळी या खुल्या भूखंडाचा वापर मुलांना खेळण्यासाठी मैदान म्हणून देखील होऊ शकतो.

हा भूखंड तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचे नियोजन क्षेत्रात होता. प्राधिकरणाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत हा भूखंड मोकळाच आहे. हा भूखंड शहरातील प्रमुख अशा भक्ती-शक्ती शिल्पसमूहालगत आहे. जगदगुरु संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा येथूनच जातो. त्यामुळे सदर भूखंड शिवजयंतीसाठी राखीव ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

### अन्यथा जनआंदोलन

» पीएमआरडीएमार्फत या भूखंडाचे प्लॉट पाडून त्यातील काही क्षेत्र विक्री करण्यात आले आहे. परंतु, निगडी परिसरातील नागरिक व प्रामुख्याने वारकरी मंडळी आणि शिवभक्त यांचा व शहरातील सर्वच राजकीय पक्ष व सामाजिक मंडळांचा या भूखंड विक्रीला तीव्र विरोध आहे. पीएमआरडीएने हे भूखंड विक्री रद्द करून भूखंड हे सार्वजनिक वापराचे प्रयोजनासाठी राखीव ठेवावा अशी सर्वांचीच मागणी आहे. नागरिकांची मागणी मान्य न करताच भक्ती – शक्ती चौकातील भूखंड बिल्डरांच्या घशात घालण्याचा प्रकार झाल्यास कठोर जन आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

### सर्वपक्षीय कार्यकर्ते, सामाजिक संघटनांची वज्रमूठ...

»राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी नगरसेवक अमित गावडे, भाजपचे प्रदेश सचिव अमित गोरखे, अनुप मोरे, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले, मारुती भापकर, धनाजी येळकर पाटील, मानव कांबळे, भाऊसाहेब अडागळे, संजय ससाणे, रवी खिलारे,गणेश भाऊ भांडवलकर, संतोष वाघे, भरत शेठ महानावर, परमेश्वर बुरले,रोहिदास शिवणेकर अरुण रणदिवे, सुनील शिंदे, सुनील भिसे, हौस राव शिंदे,युवराज कोकाटे, स्मिता पवार, कमल घोलप, स्मिता पवार,, अरुण रणदिवे, दिगंबर बालुरे, राजू सावळे, सचिन काळभोर, प्रकाश जी जाधव, लक्ष्मण रानवडे , संजय ससाने, आकाश आरगडे, लक्ष्मण रानवडे , मारुती दाखले , प्रबुद्ध कांबळे, सचिन बोराडे, रुपेश महाराज, के के कांबळे, विनोद भंडारी , विशाल शेठ मानकरी, सुरेश सकट, युवराज कोकाटे, सतीश काळे, बाबा आलम, नकुल भोईर , सचिन आल्हाट, सुरेश ठाकर, बाबा परब, सतीश मरळ, अण्णा कसबे, काशिनाथ नखाते, सरकटे, संजय जाधव, गणेश वाघमारे आदी आंदोलनात सहभागी झाले होते.

# सोसायट्यांना आमदार निधीतून मदत!

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आश्वासन

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**कोथरूडमधील सोसायट्यांना सौर ऊर्जा यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरे आणि घनकचरा प्रक्रिया उपक्रमांसाठी आमदार निधीतून मदत करण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्वांनी पाण्याचे योग्य नियोजन करण्याचे आवाहनही केले.**

कोथरूड मतदारसंघातील एरंडवणे भागातील विविध सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांबरोबर झालेल्या संवादावेळी पाटील बोलत होते. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, कोथरूड मंडल अध्यक्ष पुनीत जोशी, माजी नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, जयंत भावे यावेळी उपस्थित होते. बैठकीत सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रामुख्याने महापालिकेच्या अखत्यारितील विविध अडचणी पालकमंत्र्यांना सांगितल्या. त्यात प्रामुख्याने पाणीपुरवठा, वाहतूक नियंत्रण, कचरा संकलन, रस्ते दुरुस्ती आदींचा समावेश होता. या सर्व समस्या तातडीने दूर करण्याच्या सूचना पाटील यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिल्या.

### आमदार निधीतून मदत...

**» सोसायट्यांना ऊर्जा निर्मितीसाठी सोलार पॅनल बसविणे, सीसीटीव्ही कॅमेरे आणि घनकचरा व्यवस्थापन होण्यासाठी आमदार निधीतून मदत केली जाईल. प्रत्येक सोसायटीतील घरकाम करणाऱ्या महिलांसाठी सॅनिटरी पॅड नॅपकीन आणि सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन बसवून देण्याचे आश्वासन पाटील यांनी दिले.**



# अभाविपकडून पुणे विद्यापीठात तोडफोड

## अश्लील रॅप साँग शूट केल्याचा आरोप

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक सुरू असतानाच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने आक्रमक आंदोलन केलं. अभाविपने विद्यापीठात अश्लील रॅप साँगचं शूट झालं आणि त्यावर कुलगुरूंनी कारवाई केली नाही, असा आरोप केला आहे.**



पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक सुरू असतानाच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने आक्रमक आंदोलन केलं. अभाविपने विद्यापीठात अश्लील रॅप साँगचं शूट झालं आणि त्यावर कुलगुरूंनी कारवाई केली नाही, असा आरोप केला आहे. विशेष म्हणजे आंदोलकांनी विद्यापीठात तोडफोड केल्याचंही समोर आलं आहे. यावर अभाविपच्या एका प्रतिनिधीने टीव्ही ९ मराठीशी बोलताना आंदोलनामागील भूमिका स्पष्ट केली.

अभाविपने म्हटलं, "काही दिवसांपूर्वी या ठिकाणी रॅप साँगचं शुटिंग झालं. आम्हाला लाज वाटते की, आज त्याच खुर्चीवर कुलगुरू बसले आहेत. ज्यावेळी कुलगुरूंनी कारवाई करायला हवी होती तेव्हा त्यांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. अद्याप दीक्षांत समारंभ झालेला नाही. ७० दिवस उलटून गेले विद्यार्थ्यांच्या परीक्षा वेळेवर झालेली नाही." अभाविपने आम्ही तोडफोड केलेली नाही, संवैधानिक मार्गाने आंदोलन केल्याचं म्हटलं. मात्र, प्रत्यक्षात बैठक सुरू असलेल्या सभागृहात दरवाज्या काचा फुटलेल्या आणि त्याचा खच सभागृहात पडलेलाही दिसतो आहे.

### विद्यापीठात ट्रॅफिक जॅम आंदोलन

**»विद्यार्थ्यांचे विविध प्रश्न विद्यापीठाने प्रलंबित ठेवल्याबाबत अभाविपने सोमवारी विद्यापीठात ट्रॅफिक जॅम आंदोलन केले. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या विद्यार्थ्यांचे न झालेले पदवी ग्रहण सोहळा आणि डिग्री सर्टिफिकेट न दिल्यामुळे विद्यार्थ्यांचे परदेशातील प्रवेश प्रलंबित आहेत. परीक्षांचे निकाल प्रलंबित राहण्याबरोबरच जाहीर झालेल्या निकालांमध्ये चुका आहेत. खाशाबा जाधव क्रीडा संकुलाचे उद्घाटन होऊनही क्रीडा विद्यार्थ्यांना वापरण्यास बंदी आहे. बीएस्सी-बीएडच्या विद्यार्थ्यांना कमवा व शिका योजनेचा लाभ मिळण्यासाठी आंदोलन करण्यात आले.**

# 'कॉसमॉस' सायबर हल्ला प्रकरणातील ११ जणांना शिक्षा


## 94 कोटी 42 लाख रुपये लांबविले

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

कॉसमॉस सहकारी बँकेवर झालेल्या सायबर हल्ला प्रकरणातील अकरा आरोपींना न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा सुनावली. या प्रकरणात पुणे पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेने अटक केली होती. पैकी एका आरोपीचा मृत्यू झाला आहे.

कॉसमॉस बँकेच्या गणेशखिंड रस्त्यावरील सर्व्हर यंत्रणेवर सायबर हल्ला करून एकूण ९४ कोटी ४२ लाख रुपयांची रक्कम लांबविली होती. या प्रकरणी पोलिसांनी १८ आरोपींना अटक केली होती. फहिम मेहफूज शेख (रा. भिवंडी, ठाणे), फहिम अझीम खान (रा. आझादनगर, सिल्लोड, छत्रपती संभाजीनगर), शेख महमंद अब्दुल जब्बार (रा. सिल्लोड, छत्रपती संभाजीनगर), महेश साहेबराव राठोड (रा. भोकर, जि. नांदेड), नरेश लक्ष्मीनारायण महाराणा (रा. विरार, जि. पालघर), महमंद सईद इक्बाल हुसेन जाफरी ऊर्फ अली (रा. हमालवाडा, दर्गा रस्ता, नांदेड), युस्टेस ऑगस्टीन वाझ (रा. जोगेश्वरी, मुंबई), अब्दुला अफसरअली शेख (रा. मीरा रोड, जि. ठाणे), बशीर अहमद अब्दुल अझीज शेख (रा. भायखळा, मुंबई), सलमान महंमद नईम बेग (रा. तन्वरनगर, मुंब्रा, जि. ठाणे), फिरोझ यासीन शेख (रा. काळाचौकी, मुंबई) अशी शिक्षा सुनावलेल्यांची नावे आहेत, अशी माहिती पुणे पोलिसांनी दिली.

आरोपी फहिम शेख, फहिम खान, शेख जब्बार, महेश राठोड, नरेश महाराणा, महंमद जाफरी, युस्टेस वाझ यांना न्यायालयाने दोषी ठरवून चार वर्षांची साधी कैद, २०० रुपये दंड आणि दंड न भरल्यास तीन दिवसांची कैद अशी शिक्षा सुनावली आहे.




# ‘नेमकचि बोला’ कोणती ‘विचारधारा’?

## » राष्ट्रवादीच्या निष्ठावंताचा प्रश्न : डॉ. अमोल कोल्हेंची संदिग्ध भूमिका

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**विरोधी पक्षनेते अजित पवार भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा मागील काही दिवासांपासून रंगल्या होत्या. यावर अजित पवारांनी या चर्चा फेटाळून लावत राष्ट्रवादीतच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. अशातच, राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे अमोल कोल्हे यांनी एक फोटो सोशल मीडियावर पोस्ट शेअर केला आहे. यावरुनच कोल्हे भाजपाच्या वाटेवर असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.**




याबाबत अधिक माहिती अशी की, दि.२३ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभरात 'जागतिक पुस्तक दिन' साजरा केला जातो. याच निमित्ताने खासदार अमोल कोल्हेंच्या एका पोस्टमुळे त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा पुन्हा एकदा रंगू लागल्या आहेत.

दरम्यान, काही दिवसांपूर्वीच अमोल कोल्हे यांनी 2024 ला मी शरद पवार यांच्यासोबतच असणार आहे, अशी प्रतिक्रिया दिली होती. माझ्या विषयीच्या बातम्या पेरल्या जात आहेत. हीच माझ्या कामाची पोचपावती आहे. माझ्या मतदारसंघात सगळ्यात जास्त कामे झाली आहेत, असेही ते माध्यमांशी बोलताना म्हणाले होते.

आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लवकरच जाहीर होती. सध्या राज्यात अजित पवार आणि राष्ट्रवादीच्या भूमिकेबाबत अद्यापही संभ्रम आहे. त्यात खासदार अमोल कोल्हे यांची गेल्या दीड वर्षांतील वारंवार बदलणारी भूमिका पाहात डॉ. कोल्हे यांनी संदिग्ध वातावरण निर्माण करु नये, अशी अपेक्षा राष्ट्रवादीच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे.

### काय आहे अमोल कोल्हेंची पोस्ट...

» जागतिक पुस्तक दिनानिमित्त अमोल कोल्हे यांनी ट्विटरवर ही पोस्ट केली आहे. ज्यामध्ये पहिल्या फोटोत त्यांच्या हातात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या भाषण संग्रहाचे पुस्तक ‘नेमकचि बोलणे’ हे पुस्तक दिसत आहे. तर दुसऱ्या फोटोत ‘द न्यू बीजेपी’ नावाचे नलिन मेहता यांचे पुस्तक वाचत असल्याचे दिसत आहे. असा एकत्रित फोटो पोस्ट करीत विचारधारा कोणतीही असो, समजून घेण्यासाठी पुस्तकांशिवाय चांगला गुरू नाही, असा संदेशही डॉ. कोल्हे यांनी दिला आहे.

### “द न्यूज बीजेपी” आत्ताच का?

» भाजपाने शिरुर लोकसभा मतदार संघावर आताच ‘क्लेम’ केला आहे. या मतदार संघात भाजपा-शिवसेना एकत्रित निवडणूक लढवल्यास माजी खासदार शिवाजीराव आढळराव-पाटील यांना तिकीटासाठी शिंदे गट आग्रही राहणार आहे. दुसरीकडे, मतदार संघात राष्ट्रवादीच्या स्थानिक आणि मातब्बर नेत्यांपैकी अनेकांनी डॉ. कोल्हे यांच्या विरोधात अप्रत्यक्ष आघाडी उघडली आहे. महाविकास आघाडीत सर्व अलबेल आहे असेही नाही. त्यामुळे महाविकास आघाडीच्या मदतीने २०२४ ची निवडणूक विजयी होणे अवघड वाटत असल्यामुळे डॉ. कोल्हे यांनी भाजपासोबत जुळवून घेण्याचा प्रयत्न केला आहे. अन्यथा पुरोगामी महाराष्ट्रासाठी भरभरून बोलणारे डॉ. कोल्हे अचानक भाजपाची विचारधारा समजून घेण्याचा प्रयत्न का करतील? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

---

# वंचितच्या कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

## » अजित गव्हाणे : राज्य, केंद्र सरकारला घरचा रस्ता दाखवा

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**केंद्र व राज्य सरकारचे चुकीचे निर्णय जनतेपर्यंत पोहचवा. वाढती महागाई, इंधन दरवाढ, गॅसचे वाढत्या दरामुळे सर्वसामान्य नागरिकांचे जगणे बेहाल झाले असून नागरिकांमध्ये सरकारच्या कारभारावर रोष आहे. मतदार निवडणूकीची वाट बघत असून राज्य, केंद्र सरकारला मतदानातून घरचा रस्ता दाखविणार आहे. आगामी महापालिकेची निवडणूक कधी होईल, हे आताच सांगता येत नसले तरी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी गाफील न राहता सक्रीयपणे पक्षाचे काम करावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केले. यावेळी वंचित आणि शीख बांधवांनी राष्ट्रवादीमध्ये जाहीर प्रवेश केला. गव्हाणे यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.**

चिखली येथे पार पडलेल्या मासिक सभेत शहराध्यक्ष अजित गव्हाणे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, युवक अध्यक्ष इम्रान शेख, माजी नगरसेवक राहुल भोसले, शाम लांडे, पंकज भालेकर, विनोद नढे, अरुण बोऱ्हाडे, संगीता ताम्हणे, धनंजय भालेकर, लता ओवाळ, सचिन औटे, सतीश दरेकर, तुषार कामटे, राजेंद्र साळुंखे, श्रीधर वाल्हेकर, देवेंद्र तायडे, मंगला जाधव, पंडित गवळी, ॲडव्होकेट गोरक्ष लोखंडे, दत्तात्रय जगताप, हरिभाऊ तिकोने, गोरक्ष पाषाणकर, वसंत बोराटे, तानाजी खाडे, मंदा आल्हाट, दत्तोबा लांडगे, सुरेखा लांडगे, उत्तम आल्हाट, संजय औसरमल, पल्लवी पांढरे, काशिनाथ जगताप आदी उपस्थित होते. यावेळी वंचितमधून सुहास देशमुख, केडी वाघमारे, बिरदेव मोटे, शाम कसबे, अण्णासाहेब पारे, किरण शेगोकार, सपना कदम, सुप्रिया जाधव, सुलभा हिंगे प्रवीण शिंदे, देवेंद्र गायकवाड तर शीख समाज बांधव जितेंद्र सिंग लोहेट, सविंदर सिंग बाला, मनोहर सिंग लोहेट, महेंद्रसिंग हंस, दिलबर सिंग गिल, महेंद्रसिंग जबाल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

### भाजपामुळे महापालिकेत भ्रष्टाचार...

»अजित गव्हाणे पुढे म्हणाले, महापालिकेत राष्ट्रवादीच्या सत्ता काळात विकास कामातून शहराचा चेहरा-मोहरा बदलला आहे. विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे शहरावर विशेष प्रेम आहे. त्यामुळेच दादांनी स्वतः लक्ष देऊन शहर विकास कामात परिपूर्ण केले आहे. मात्र, गेल्या पाच वर्षांत भाजपच्या सत्ता काळात शहराचा विकास खुंटला आहे. भाजपने पालिकेत पाच वर्षांत फक्त भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचार असाच कारभार केल्याची टाकीही गव्हाणे यांनी केली.



## संपादकीय »

# अर्धशतकी अक्षयगाथा!

***‘हे आपण करू शकतो’ हा विश्वास सुनील-कपिलच्या भारतीय संघांनी या देशात रुजवला; तर सचिनच्या खेळीमधून ‘येथे आपण जिंकलेच पाहिजे’ हा मंत्र कोट्यवधींना मिळत होता..***

त्याच्याविषयीचे किस्से आणि आठवणी अगणित आहेत. पण नुकतीच एका मुलाखतीत त्याने सांगितलेली आठवण, सचिन रमेश तेंडुलकर या अद्वितीय क्रिकेटपटूच्या प्रदीर्घ यशोगाथेमागील रहस्य उलगडणारी ठरावी. सचिनचे कसोटी पदार्पण पाकिस्तानविरुद्ध कराची येथे झाले. षोडशवर्षीय आत्मविश्वासपूर्ण उत्साहात खेळत असताना त्याने सुरुवातीस दोन चौकार वगैरे लगावले. पण अल्पावधीतच तो त्रिफळाचीत होऊन परतला. ‘मी अजूनही बहुधा कसोटी दर्जाचा नसेन’ या कातर भावनेने मनात घर केले. तरीही एक निश्चय केला.. पुढील खेळीत धावफलकाऐवजी घड्याळाकडे पाहण्याचा! खरोखरच त्यानंतरच्या खेळीत सुरुवातीचा अर्धा तास सचिन केवळ घड्याळाकडे पाहात राहिला. खेळपट्टीवर टिकून राहण्यास प्राधान्य दिले. धावा होत राहिल्या, आत्मविश्वास वाढत गेला. धावांपेक्षाही घड्याळाकडे, म्हणजे काळाकडे पाहात वाटचाल करण्याचे ते तंत्र सचिनच्या कालजयी कारकीर्दीसाठी सुकाणू ठरले. आणखी एक प्रसंग. त्याच मालिकेच्या अखेरच्या सामन्यात एका वेगवान चेंडूने सचिनच्या नाकाचा वेध घेतला आणि रक्तपात झाला. सहकारी काळजीतून आणि प्रतिस्पर्धी कुत्सितपणे, सचिनला पॅव्हेलियनमध्ये जाऊन उपचार घेण्याविषयी सांगत होते. पण संघाला त्याची गरज होती. मनाचा निर्धार करून सचिन खेळत राहिला आणि भारताला तो सामना व ती मालिका अनिर्णित राखता आली..

भारत-पाकिस्तान संबंध त्या काळात आजच्यापेक्षाही अधिक बिघडलेले होते. भारतविरोधाचे विष प्राशन करून आलेले प्रेक्षकांमध्ये असंख्य होते. कुठे ‘आझाद कश्मीर’चे झेंडे प्रेक्षकांतून उसळायचे, काहींनी ‘खलिस्तान’चे झेंडे आणलेले दिसायचे. याशिवाय नारेबाजी आणि हुल्लडबाजी सुरूच होती.. अर्थात तेवढेच एकमेव आव्हान नव्हते. पाकिस्तानच्या संघात उत्तमोत्तम खेळाडू होते. चार सामन्यांची ती मालिका पाकिस्तानचा कप्तान इम्रान खानला कोणत्याही परिस्थितीत जिंकायचीच होती.

# पेन्शनच्या पेचावर तीन उपाय!



भूमिका

**२००४ मध्ये विसर्जित केली गेलेली जुनी पेन्शन योजना परत आणावी यासाठी वेगवेगळ्या राज्यांमधले राज्य सरकारी कर्मचारी नुकतेच संपावर गेले होते. त्यांच्या मागण्यांपुढे मान तुकवून जुनी पेन्शन योजना आणणे राज्या सरकारांना महागात पडू शकते. पण मग हा प्रश्न कसा सोडवता येईल?**



एका कुंभकर्णाला विनाकारण जागे करण्याची चूक पाच राज्यांनी केली आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये राजस्थान, छत्तीसगड, पंजाब, हिमाचल प्रदेश आणि झारखंडने अटलबिहारी वाजपेयी सरकारने २००४ मध्ये बंद केलेल्या जुन्या पेन्शन योजनेकडे परत जाण्याचा निर्णय घेतला आहे. या पाच राज्यांचे अनुसरण करण्यासाठी आता इतर राज्यांवर दबाव वाढतो आहे. महाराष्ट्रही या शक्यतेचा विचार करतो आहे. राज्य सरकारने या मुद्द्याचा विचार करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे. अशीच केंद्र सरकारचीदेखील समिती आहे.कोविडच्या धक्क्यातून देशाची आर्थिक स्थिती आणि सरकारचे अर्थबळ हळूहळू सावरण्यास सुरुवात झाली असतानाच हे एक नवीन आव्हान आपल्या समोर आले आहे. जुन्या पेन्शन योजनेकडे परत जाण्याचा पूर्ण खर्च हा कदाचित वर्तमान काळात स्पष्ट होणार नाही, परंतु पुढील वर्षांमध्ये हा खर्च झपाट्याने वाढतच जाईल. भावी पिढ्यांवर आणि भावी सरकारांवर त्याचे ओझे असेल. राज्याला निकटदृष्टिदोष – मायोपिया – महाग पडेल. जुन्या पेन्शन प्रणालीवर परत जाण्यास सहमती देणे अखेरीस हानीकारक ठरेल. या लेखात मी सध्या सुरू असलेल्या पेन्शनवरील वादविवाद काय आहे, खर्चाचा भार सहन करण्याची विविध राज्यांची क्षमता कितपत आहे, भारतीय लोकसंख्येची वेगाने बदलणारी रचना पुढील वर्षांत पेन्शन समस्या का बिकट करेल, आणि राज्य सरकारकडे कोणते धोरणात्मक पर्याय आहेत, या प्रश्नांचा आढावा घेतला आहे.

आर्थिक परिणामांचा विचार

२००४ साली जुनी पेन्शन योजना विसर्जित केली गेली होती. तिच्या जागी नवीन पेन्शन योजना राबवण्यात आली. यातील फरक आपण प्रथम पाहू या. जुनी पेन्शन योजना लाभार्थ्यांना निवृत्तीनंतर निश्चित उत्पन्न देते. त्यांना मिळणारे मासिक पेन्शन त्या वर्षी सरकारने जमा केलेल्या करातून दिले जाते. त्या अर्थाने करदात्यांची सध्याची पिढी ज्येष्ठ नागरिकांच्या निवृत्तीनंतरच्या उत्पन्नासाठी निधी देते. या प्रकारचा पिढ्यांतील अलिखित करार हा आपल्याला जगभर दिसतो. तरुण करदात्यांची संख्या झपाट्याने वाढते आणि सेवानिवृत्त लोकांची संख्या कमी गतीने वाढते तेव्हा ही प्रणाली व्यवस्थित सुरू राहते. (त्याबद्दल या लेखात नंतर.)नवीन पेन्शन योजना खूप वेगळी आहे. सरकारी कर्मचारी निवृत्तीनंतर त्याच्या अपेक्षित गरजांसाठी उत्पन्नाचा एक भाग बाजूला ठेवतो, किंवा सरकार त्याला सक्तीने बचत करायला लावते. तो निवृत्त होईपर्यंत तो पैसा गुंतवला जातो. त्यानंतर त्याच्या नावावरील रक्कम मासिक पेन्शनसाठी वापरली जाते. तिला कोणतीही हमी रक्कम नाही. त्या अर्थाने, नवीन पेन्शन योजना ही खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या प्रॉव्हिडंट फंडासारखी आहे. तुम्ही तुमच्या कामकाजाच्या काळात किती बचत केली आहे, आणि पेन्शन फंडाद्वारे ती रक्कम किती चांगल्या प्रकारे गुंतवली आहे, यावर तुमची पेन्शन अवलंबून असते.

विविध राज्यांमध्ये जुन्या पेन्शन प्रणालीकडे परत जाण्याचे आर्थिक परिणाम काय आहेत? राज्यांना दोन स्रोतांकडून कर मिळतात. एक स्रोत म्हणजे राज्य सरकारे स्वत: कर गोळा करतात (उदा. मुद्रांक शुल्क) आणि दुसरा स्रोत म्हणजे त्यांना केंद्र सरकारकडून जीएसटीसारख्या करांच्या वाट्यातून मिळतो. तक्ता क्रमांक १ वर आता एक नजर टाका.

**सध्याचा चढा पारा हा आपल्या सगळ्यांना काही संदेश देऊ पाहतोय. ज्या नाशिकमध्ये ३५ अंशांच्या वर मे मध्ये तापमानाची नोंद होत नव्हती, तिथे आता एप्रिलमध्ये ४० अंशांवर पारा जातोय.**



# उष्माघात, निसर्गचक्र आणि पर्यावरणीय संकट

खानदेशात उन्हाच्या झळांची तशी सगळ्यांना सवय असली तरी देखील एप्रिलमध्ये ४३ अंशांच्या वर तापमानाची होणारी नोंद ही आगामी पर्यावरणीय संकटाची नांदी म्हणायला हवी. मे मध्ये खानदेशातील तापमान ४६ अंशांवर जाईल.

पृथ्वीवरील तापमान वाढीच्या संकटाकडे आणि वेगाने बदलणाऱ्या पर्यावरणीय संकटाकडे आता लक्ष द्यावेच लागणार आहे. हे मानवा, आता तरी आम्हा निसर्गाकडे पाहा, आमची काळजी घ्या...हेच जणू वाढता उष्मांक आपल्याला सांगतोय.

बिनीचे कार्यकर्ते

सध्याचे वारे एवढे उष्ण आहेत, की अनेक रुग्णांना श्वास घेण्यास अडचण होत आहे. रुग्णांचेच काय अनेक सामान्य प्रकृतीच्या लोकांनाही श्वास घेण्यास त्रास होत असल्याच्या तक्रारी येताहेत. उष्माघाताच्या बळींची संख्या वाढत आहे.

काही सीबीएसईच्या शाळांनी दहा दिवस आधीच सुट्ट्या जाहीर केल्या आहेत. दुपारच्या सत्रात ड्यूटीवर जाणारे कामगार किंवा सर्वच नोकरदार वर्गाला वाढत्या उष्म्याला तोंड देणं अवघड बनत आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी भर उन्हात परीक्षेला जाणं अतित्रासदायक ठरत आहे. वाढत्या तापमानाचा सर्वाधिक त्रास होतो, तो ज्येष्ठ नागरिकांना. वाढत्या उन्हामुळे आरोग्याच्या तक्रारींमध्येही वाढ होत आहे. हॉस्पिटल्स आणि दवाखान्यांमध्ये नागरिकांची गर्दी वाढत आहे.

नाशिक, जळगाव, धुळे आणि नंदुरबार या महापालिकांच्या पातळीवर तसेच काही खाजगी रुग्णालयांमध्ये देखील उष्माघाताच्या रुग्णांसाठी उपचाराची सोय करण्यात आली आहे. वैद्यकीय सुविधांच्या पातळीवरची ही सज्जता योग्यच म्हणायला हवी.

सांजवेळ

सध्या वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यांपासून डोके आणि कान प्रामुख्याने सांभाळायला हवे. त्यात शरीरातील पाणी कमी झाल्याने अधिक त्रास होतो. यंदाच्या उन्हाळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कमाल आणि किमान तापमानात मोठे अंतर आहे.

ज्येष्ठ नागरिक वगळता उर्वरीत सगळ्या पिढीतील नागरिकांची शरीरयष्टी ही संकरीत खाण्यातून निर्माण झालेली आहे. त्यामुळे अनेक आजार जडत असून प्रतिकार क्षमतेवर त्याचा मोठा परिणाम झाल्याचे वैद्यकीय क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# खारघर दुर्घटनेचा प्रश्न हाय कोर्टात!

## » मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांविरोधात गुन्हा नोंदवण्याची मागणी

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'नवी मुंबईतील खारघर येथे आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्याच्या सोहळ्यादरम्यान उष्माघाताने व चेंगराचेंगरीने १४ जणांचा नाहक मृत्यू झाला. याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अन्य संबंधित व्यक्तींचे ढिसाळ नियोजन कारणीभूत आहे. त्यामुळे त्यांच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश द्यावेत', अशा विनंतीची फौजदारी जनहित याचिका सोमवारी उच्च न्यायालयात करण्यात आली आहे.**

व्यवसायाने वकील असलेल्या शैला कंथे यांनी ॲड. नितीन सातपुते यांच्यामार्फत ही याचिका केली असून या आठवड्यात किंवा २ मे रोजी याप्रश्नी प्राथमिक सुनावणी होण्याची शक्यता आहे. या याचिकेत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांबरोबरच आरोग्यमंत्री, पालकमंत्री, नवी मुंबई पोलिस आयुक्त, राज्याचे पोलिस महासंचालक, जिल्हाधिकारी, नवी मुंबई महापालिका आयुक्त, आयएएस अधिकारी डॉ. योगेश म्हसे, कोकण विभागीय आयुक्त, कन्सेप्ट कम्युनिकेशनचे अध्यक्ष विवेक संचेती व 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कारविजेते आप्पासाहेब धर्माधिकारी यांनाही प्रतिवादी करण्यात आले आहे.



'सध्या करोनाचे संकट असतानाही आणि प्रचंड तापमान असूनही सरकारने भर उन्हात पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले. इतकेच नव्हे तर जवळपास दहा लाख अनुयायी जमले असूनही त्यांच्याकरिता पुरेसे पाणी, अन्न इत्यादीची सुविधाच दिली नाही. शिवाय १४ कोटी रुपये खर्चूनही मंडपही घालण्यात आला नाही. त्यामुळे १४ जणांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या या सर्वांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश द्यावेत. तसेच गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास सीबीआयकडे देण्याचा आदेश द्यावा', अशी विनंती याचिकेत करण्यात आली आहे.

### मृतांच्या कुटुंबांना 50 लाखांची भरपाई मिळावी'

**»'प्रत्येक मृताच्या कुटुंबाला ५० लाख रुपयांची भरपाई व जखमींना पाच लाख रुपयांची भरपाई देण्याचे निर्देश सरकारला द्यावेत. तसेच याचिका निकाली निघेपर्यंत हीच अंतरिम भरपाई देण्याचे निर्देश द्यावेत', अशी विनंतीही याचिकेत करण्यात आली आहे.**

# मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन 'स्टॅम्पुड्यटी' बाबत निर्णय घेऊ!

## » क्रेडाई नागपूर मेट्रोच्या नवनियुक्त कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळ्यात उपमुख्यमंत्र्यांचे आश्वासन

। नागपूर ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून स्टॅम्पड्युटी (मुद्रांक शुल्क) काही काळासाठी कमी करण्याचा निर्णय घेण्यात येईल', असे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिले.**

क्रेडाई नागपूर मेट्रोच्या नवनियुक्त कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा रामदासपेठेतील हॉटेल सेंटर पॉइंट येथे झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महापालिका आयुक्त राधकृष्णन बी., नवनिर्वाचित अध्यक्ष गौरव अगरवाला, सचिव एकलव्य वासेकर, माजी अध्यक्ष विजय दर्गन यांची उपस्थिती होती.

फडणवीस म्हणाले, 'गेल्या दहा-बारा वर्षांत शहर झपाट्याने बदलले आहे. प्रमुख शैक्षणिक संस्था नागपुरात आल्या असून त्यापाठोपाठ औद्योगिक प्रगती होत आहे. येत्या काळात शहरालगतची छोटी गावे मेट्रोशी जोडली जाणार आहेत.

त्यामुळे सबअर्बन किंवा पेरिअर्बन म्हणविल्या जाणाऱ्या या भागात रिअल इस्टेट क्षेत्राला प्रगती साधता येईल. नागपूर देशाचे लॉजिस्टिक कॅपिटल करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.



कोव्हिडनंतर चीनमधून मोठ्या प्रमाणात कंपन्या बाहेर पडत आहेत. त्या भारतात येणार असून त्यांना लागणाऱ्या सोयीसुविधांच्या अनुषंगाने नागपुरातील लॉजिस्टिक पार्क उपयोगी ठरणार आहे. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत ग्रामीण भागात दहा लाख घरे बांधण्यात येणार आहेत.' तत्पूर्वी, गौरव अगरवाला आणि विजय दर्गन यांनी मनोगत व्यक्त केले. निवेदन श्वेता शेलगावकर यांनी केले.

### 2025मध्ये 'फाल्कन-2000' मिहानमधून!

**»मिहानमधील डसॉल्ट आणि रिलायन्सच्या एअरोस्पेस पार्क येथे २०२५मध्ये 'फाल्कन २०००' या विमानाची निर्मिती होणार आहे. संपूर्ण विमान एकाचजागी तयार करणारे हे देशातील पहिले युनिट ठरणार आहे. त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या नागपूर विमानतळाच्या विस्तारासंदर्भातील याचिकेवर येत्या पंधरा ते वीस दिवसांत सुनावणी होणार आहे. तो प्रश्न निकाली लागल्यास येथे दोन रनवे राहणार आहेत, असे फडणवीस यांनी सांगितले.**

### 'मी असेपर्यंत रेतीचोरांना सोडणार नाही'

**»राज्याचे वाळू धोरण तयार झाले आहे. काही लोक रेतीघाटाचा लिलाव होऊ द्यायचे नाहीत आणि नंतर तीच रेती चोरीच्या मार्गाने विकायचे. मी उपमुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदा रेतीचोरांना वठणीवर आणले. काही जणांवर गुन्हेदेखील दाखल केले आहेत. मी असेपर्यंत रेतीचोरांना सोडणार नाही. सर्वांना रेती उपलब्ध होईल', असे फडणवीस यांनी सांगितले.**



# चीन लवकरच 6G सुरु करणार!

## चीन टाकणार आता 'पुढचं पाऊल', या निर्णयाने अमेरिकेला भरली धडकी

। नवी दिल्ली महाईन्यूज ।

**जगभरात 5G टेक्नोलॉजीची चर्चा सुरू आहे. जगातील काही देशात 5G सर्विस सुरू करण्यात आली आहे तर भारतातील काही प्रमुख शहरात ही सर्विस उपलब्ध करून दिली जात आहे. परंतु, चीनने आता यापुढचं पाऊल टाकण्याचं ठरवलं आहे. चीननं पुढच्या जनरेशनवर केंद्रीत केलं आहे. परंतु, 5G सोबत हाय स्पीड इंटरनेटची सुविधा मिळते. जी 4G च्या तुलनेत २० पट जास्त वेगवान आहे. परंतु, 6G वायरलेस इंटरनेट, हाय स्पीड इंटरनेट सर्व रेकॉर्ड मोडणार आहे. भारतात अजून ग्रामीण भागापर्यंत ५जी नेटवर्क पोहोचले नाही. बीएसएनएलचे तर ४जी नेटवर्क सुद्धा नाही. तेथे चीनने ६जी साठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहे. चीनच्या या निर्णयामुळे थेट अमेरिकेला धडकी भरली आहे.**

6G वायरलेस इंटरनेटने स्पीड, लेटेंसी, स्पेक्ट्रम, आर्टिफिशियल इंटेलिजेंस, सिक्योरिटी आणि उर्जा दक्षतेमध्ये जास्त अडवान्स्ड असू शकते. अनेक देशात अजून 5G नेटवर्कसाठी संघर्ष केला जात आहे. परंतु, असा दावा केला जात आहे की, चीन लवकरच 6G वायरलेस नेटवर्कला लॉंच करू शकते. लेटेस्ट रिपोर्टनुसार, चीन अल्ट्रा-फास्ट वायरलेस इंटरनेटची टेस्टिंग सुद्धा करीत आहे. याची डाउनलोड स्पीड 100GBPS आहे. म्हणजेच ही स्पीड 5G नेटवर्कच्या तुलनेत अनेक पट जास्त आहे.

चायना एयरोस्पेस सायन्स एंड इंडस्ट्रीची दुसऱ्या अकादमीच्या २५ व्या संस्थेने पहिल्यांदा टेरा हर्ट्ज (THZ) आवृत्ति लेवल वर एक यशस्वी वायरलेस ट्रान्समिशनची माहिती दिली आहे. ज्याने 100 GBPS ची डेटा स्पीड मिळवली आहे. म्हणजेच अमेरिकेच्या 1GBPS वर चालणाऱ्या G सिग्नल पेक्षा कितीतरी पट जास्त वेगवान आहे. अमेरिका सरकारने ६जी रिसर्चसाठी १ अब्ज डॉलर ठेवले आहे. परंतु, हे स्पष्ट नाही की, हे चीनच्या पुढे जाण्यासाठी ऑप्शन असेल की नाही.

### अमेरिकेला भरली धडकी

» ६जीसाठी अनेक देशाचे प्रयत्न सुरू आहे. अमेरिकेच्या आधी चीनमध्ये ही सर्विस सुरू झाल्यास अमेरिका मागे पडेल, अशी चिंता अमेरिकेला सतावत आहे. शुक्रवारी व्हाइट हाउसने पुढचे जनरेशनचे वायरलेस कनेक्टिविटीवर चर्चा करताना इंडस्ट्रीजच्या लीडर्स सोबत चर्चा करण्यासाठी त्यांची भेट घेतली. अमेरिकेला सर्वात जास्त चिंता ही चीनची आहे.



# न्यूझीलंडला त्सुनामीचा धोका!

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

जगभरात भूकंपाच्या घटना वाढू लागल्या आहेत. अलिकडेच टर्की आणि सीरियात झालेल्या महाप्रलयकारी भूकंपाने ४० हजारांहून अधिक लोकांचा बळी घेतला. तसेच काही दिवसांपूर्वी न्यूझीलंडही भूकंपाच्या धक्क्यांनी हादरला होता. या देशाने एका महिन्याच्या अंतराने आणखी एक भूकंप पाहिला आहे. आज सकाळी पुन्हा एकदा न्यूझीलंडमध्ये ७.३ रिश्टर स्केल भूकंपाचे धक्के बसले. भूकंपाच्या तीव्रतेची माहिती नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीने दिली आहे. अद्याप या भूकंपाने झालेल्या नुकसानाची माहिती मिळालेली नाही.

एनसीएसने दिलेल्या माहितीनुसार, न्यूझीलंडच्या उत्तर-पूर्वेला असलेल्या कमडिक बेटावर आज (२४ एप्रिल) सकाळी ६.११ वाजता भूकंपाचे धक्के जाणवले. मात्र, आतापर्यंत कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती मिळालेली नाही.गेल्या महिन्यात देखील न्यूझीलंड भूकंपांच्या धक्क्यांनी हादरला होता. तेव्हा येथील कमडिक बेटांवर ७.१ रिश्टर स्केल इतक्या तीव्रतेचे धक्के बसले होते.

दरम्यान, भूकंपानंतर यूएस त्सुनामी वॉर्निंग सिस्टिमने (अमेरिकन त्सुनामी इशारा प्रणाली) त्सुनामीचा धोका वर्तवला आहे.

### नैसर्गिक आपत्तींमध्ये वाढ

» **बिघडत चाललेली इकोसिस्टम आणि मानवाच्या चुकांमुळे हवामानात निर्माण झालेला असमतोल यामुळे पृथ्वीवरील नवीन आव्हाने दिवसेंदिवस वाढत आहेत. तापमानात वाढ होणं, हिमनद्या वितळणं, अवकाळी पाऊस, मान्सूनच्या पाऊस कमी होणं, विनाशकारी पूर आणि भूकंपात वाढ होणे असे बदल आपण अलिकडच्या काळात पाहत आहोत.**

# "दोन्हीकडच्या राज्यकर्त्यांची मानसिकता सारखीच"

। नवी दिल्ली महाईन्यूज ।

ठाकरे गटाचं मोदी सरकारवर टीकास्त्र



ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी जळगावमध्ये झालेल्या सभेत "शिवसेना कुणाची हे पाकिस्तानही सांगेल", असं विधान केल्यानंतर त्यावरून चर्चा सुरू झाली आहे. त्याचवेळी ठाकरे गटाकडून थेट पाकिस्तान आणि भारताची तुलना करत सत्ताधारी भाजपावर टीकास्त्र सोडण्यात आलं आहे. सामनातील अग्रलेखातून पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या एका विधानाचा संदर्भ घेत त्यांना लक्ष्य करण्यात आलं आहे. त्याचवेळी त्यांचं उदाहरण देऊन भारतातील सत्ताधाऱ्यांवरही आगपाखड केली आहे.

काय म्हणाले शाहबाज शरीफ?

शाहबाज शरीफ यांनी काही दिवसांपूर्वी भारतावर टीका करणारं एक विधान केलं होतं. पाकिस्तानातील पंजाब प्रांतात भारताकडून हल्ला होऊ शकतो, अशी भीती दाखवत तिथल्या निवडणुका पुढे ढकलण्याची तयारी शरीफ यांनी सुरू केली आहे. त्यावरून भारतातून तीव्र प्रतिक्रिया उमटत असताना ठाकरे गटाकडून यावर परखड भूमिका घेण्यात आली आहे. मात्र, असं करतानाच शरीफ यांच्या या पद्धतीशी भारतातील सत्ताधारी भाजपाच्या धोरणाचीही तुलना

### पाकिस्तानात भलतेच घडताना दिसत आहे"

» **"धार्मिक वाद, जातीय दंगली, सीमेवरील दहशतवादी हल्ले आणि त्या वातावरणावर भाजल्या जाणाऱ्या राजकीय स्वार्थाच्या पोळ्या असे एक समीकरणच मागील काही वर्षांत आपल्या देशात बनले आहे. किंबहुना निवडणुकांसाठी असे अस्थिर आणि तणावाचे वातावरण आपल्या देशात जाणीवपूर्वक तयार केले जाते. त्या वातावरणात निवडणूक घेऊन राजकीय गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र आपल्या शेजारच्या पाकिस्तानसारख्या देशात भलतेच घडताना दिसत आहे", असं अग्रलेखात म्हटलं आहे.**

# 'भाजप मोठा हिरो झालाय, आता झिरो करावा लागेल'

## विरोधक एकवटले भाजपसाठी धोक्याची घंटा

। बंगळुरू । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीपूर्वी सर्व विरोधी पक्षांना एकत्र करण्यात बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी सोमवारी (२४ एप्रिल) पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची कोलकाता येथे भेट घेतली. या बैठकीला बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादवही उपस्थित होते.**

या बैठकीनंतर ममता बॅनर्जी यांनी प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या की, मी नितीशजींना विनंती केली आहे की जयप्रकाशजी यांचे आंदोलन बिहारमधून सुरू झाले होते, त्यामुळे आपण बिहारमध्ये सर्वपक्षीय बैठक घेतली पाहिजे. यामध्ये आपण सर्वजण एकत्र आहोत असा संदेश द्यायचा आहे. यावर माझा कोणताही आक्षेप नाही असे मी आधीच सांगितले आहे. भाजप मोठा हिरो झाला आहे, आता झिरो करावा लागेल. आम्ही एकत्र पुढे जाऊ. आम्हाला एकत्र काम करायचे आहे.

नितीश कुमार काय म्हणाले?

नितीश कुमार म्हणाले की, जे सत्तेत आहेत ते फक्त स्वतःबद्दल बोलतात बाकी काही नाही, हा स्वातंत्र्याचा लढा आहे, आपण सावध राहायला हवे. हे लोक इतिहास बदलत आहेत. प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक आहे म्हणूनच आम्ही सर्वांशी बोलत आहोत. आमची खूप छान चर्चा झाली. आवश्यकतेनुसार भविष्यात इतर पक्षांना सोबत घेऊन चर्चा करू. ममताजींसोबत सकारात्मक चर्चा झाली.

### 'सर्व पक्षांनी एकत्र यावे'

» 2024 च्या लोकसभा निवडणुकी बोलताना नितीश कुमार यांनी सांगितले की, विरोधी पक्षांनी एकत्र येऊन रणनीती तयार करण्याची गरज आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी सर्व पक्षांनी एकत्र यावे. पुढे जे काही होईल ते देशहितासाठीच होईल. आता राज्य करणाऱ्यांना काही करायचे नाही. ते फक्त स्वतःचा प्रचार करत आहेत. देशाच्या विकासासाठी काहीही केले जात नाही.महादेवप्पा व इतर कॉंग्रेस नेते उपस्थित होते.



### प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक

» **जे सत्तेत आहेत ते फक्त स्वतःबद्दल बोलतात बाकी काही नाही, हा स्वातंत्र्याचा लढा आहे, आपण सावध राहायला हवे. हे लोक इतिहास बदलत आहेत. प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक आहे म्हणूनच आम्ही सर्वांशी बोलत आहोत. आमची खूप छान चर्चा झाली.**

# 'बॉयफ्रेंड चोर'

एक काळ असा होता की कतरिना कैफ आणि आलिया भट्ट यांच्या मैत्रीची सर्वत्र चर्चा व्हायची. आलिया आणि कतरिना फक्त एकमेकांसोबत जिम करत नव्हत्या तर खूप वेळ एकत्र घालवत होत्या. मात्र आता या दोघींमध्ये काहीशी कटुता निर्माण झाली आहे. ती गोष्ट वेगळी की हे दोघे आजही स्वतःला एकमेकांचे मित्र मानतात. पण आता दोघांमध्ये पाहिल्यासारखे राहिलेले नाही.

सोशल मीडियावर सध्या एक जुना व्हिडिओ व्हायरल होत आहे. ज्यामध्ये कतरिना कैफ आणि आलिया भट्ट नेहा धुपियाच्या BFF शोमध्ये एकत्र पोहोचल्या होत्या. यादरम्यान आलिया आणि कतरिनाही मॅचिंग कपडे घालून पोहोचल्या. व्हायरल व्हिडिओमध्ये, नेहा आलियाला विचारते की जर तुला कतरिनाची एखादी भूमिका साकारण्याची संधी मिळाली, तर तू कोणती भूमिका करशील?".



या प्रश्नाचे उत्तर देण्याआधीच आलिया जीभ बाहेर काढून विचित्र तोंड करते. वेळ निघून जातो आणि आलिया नेहाला उत्तर देत नाही. मात्र, यादरम्यान कतरिनाने सांगितले की, तिने 'जिंदगी ना मिलेगी दोबारा'मध्ये बबली मुलीची भूमिका साकारली होती. पण तरीही आलिया कोणाचेच नाव घेत नाही. त्यानंतर तिला शिक्षा म्हणून मिरची खावी लागते. मात्र आता आलियाचे हे वागणे लोकांना पसंत पडलेले नाही.या जुन्या व्हिडीओवर कमेंट करत लोक लिहित आहेत की, आलिया कतरिनाचा बॉयफ्रेंड चोरून घेऊन गेली, आणि तुम्ही रोलबद्दल बोलत आहात . एका यूजरने लिहिले की, आरकेच्या प्रेयसीची कतरिनाची भूमिका आलियाने चोरली. त्याच वेळी, एक वापरकर्ता लिहितो की, ती राजनीति किंवा अजब गजब प्रेम कहानी म्हणू शकत होती. अरे फक्त 'नमस्ते लंडन' किंवा 'सिंग इज किंग' म्हटलं असतं तरी चाललं असतं. मैत्रीण असल्याने ती कतरिनासाठी काहीतरी छान बोलू शकली असती.'



# 4 वर्षांनंतर पुन्हा वाजणार 'दिल का टेलीफोन'



आयुष्मान खुरानाच्या प्रसिद्ध चित्रपटांच्या यादीत 'ड्रीम गर्ल'चा समावेश आहे. आता चाहते 'ड्रीम गर्ल 2' ची वाट पाहत आहेत ज्यात अनन्या पांडे अभिनेत्यासोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. या चित्रपटाच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या टीझरने चाहत्यांची उत्कंठा द्विगुणित केली आहे. त्याच वेळी, 'ड्रीम गर्ल 2' ची नवीन रिलीज डेट जाहीर करण्यात आली आहे.

यापूर्वी हा चित्रपट ७ जुलै रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार होता, मात्र आता तो पुढे ढकलण्यात आला आहे. आयुष्मान खुरानाने त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवरून या चित्रपटाच्या नवीन रिलीज तारखेसह एक लांब पोस्ट देखील शेअर केली आहे.

'ड्रीम गर्ल 2' आता 7 जुलै ऐवजी 25 ऑगस्टला थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. या विलंबाचे कारण चित्रपटाच्या VFX कामाला कारणीभूत असल्याचे सांगण्यात येत आहे. 'ड्रीम गर्ल 2' मध्ये VFX काम खूप महत्त्वाचे आहे, कारण आयुष्मान खुराना पूजा आणि करमची भूमिका साकारत आहे. हा चित्रपट एक धमाकेदार कॉमेडी असेल जो प्रेक्षकांना प्रचंड हसवेल. या चित्रपटात आयुष्मान खुराना आणि अनन्या पांडे मुख्य भूमिकेत आहेत.

# विराट-अनुष्का करतायेत डान्स...



विराट कोहली आणि अनुष्का शर्मा हे पॉवरफुल कपल्सपैकी एक आहे. ही जोडी अनेकदा चर्चेत असते. दोघांचे फोटो आणि व्हिडिओ अनेकदा व्हायरल होतात. चाहत्यांनीही दोघांवर भरभरून प्रेमाचा वर्षाव केला. काही दिवसांपूर्वीच विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता.

व्हायरल झालेल्या या व्हिडिओमध्ये विराट पत्नीचा ड्रेस ठीक करताना दिसत होता. चाहते या व्हिडिओवर जोरदार कमेंट करत होते आणि म्हणत होते की हे एक परफेक्ट कपल आहे. आता पुन्हा एकदा दोघांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

या व्हायरल व्हिडिओमध्ये विराट कोहली आणि अनुष्का शर्मा जिममध्ये दिसत आहेत. दोघेही मस्तीच्या मूडमध्ये दिसत आहेत. व्हिडिओ सुरू होताच, विराट आणि अनुष्का दोघेही एक पाय हातात धरून डान्स स्टेप करतात. व्हिडिओमध्ये बॅकग्राउंडमध्ये एक पंजाबी गाणे वाजत आहे, ज्यामध्ये दोघे ही डान्स स्टेप करत आहेत. व्हिडिओमध्ये दोघांची केमिस्ट्री चाहत्यांना खूप आवडली आहे.सोशल मीडियावर दोघांच्या या व्हिडिओला लोक पसंत करत आहेत. व्हिडिओवर कमेंट्स देखील येत आहेत. हा व्हिडिओ पाहिल्यानंतर सोशल मीडिया यूजर्स दोघांचीही जोरदार स्तुती करत आहेत आणि या जोडीला कोणाची नजर न लागो असे म्हणत आहेत.

विराट आणि अनुष्काला वामिका नावाची मुलगी आहे. या जोडप्याने आपल्या मुलीचा चेहरा दाखवायचा नसल्याचे स्पष्ट केले असले तरी, असे असतानाही सोशल मीडियावर वामिकाचे फोटो आणि व्हिडिओ अनेकदा पाहायला मिळतात.

# तेजश्री प्रधानने सांगितला सुखी जीवनाचा मंत्र

मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून तेजश्री प्रधानला ओळखले जाते. 'होणार सून मी या घरची' या मालिकेमुळे ती घराघरात पोहोचली. चेहऱ्यावर सुंदर हास्य आणि सुंदर अभिनय यामुळे तेजश्री कायमच चर्चेत असते. नुकतंच तेजश्रीने सुखी जीवनाचा मंत्र शेअर केला. त्यामुळे ती चर्चेत आली आहे.

तेजश्री प्रधान ही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. ती नेहमी फोटो आणि व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत असते. नुकतंच तेजश्रीने इन्स्टाग्रामवर ब्लॅक अँड व्हाईट फोटो शेअर केला आहे. त्याला दिलेल्या कॅप्शनने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहेत."प्रत्येक वेळी तुम्ही स्वतःला सुधारण्याची गरज नाही. त्यामुळे तुम्ही केलेल्या कामाचा आनंद घ्या, सुखी जीवन", असे कॅप्शन तेजश्री प्रधानने दिले आहे. या फोटोत ती फार गोड हसताना दिसत आहे.



दरम्यान मनमोहक सौंदर्याने अनेकांना घायाळ करणारी अभिनेत्री म्हणून तेजश्री प्रधानला ओळखले जाते. नाटक, मालिका, चित्रपट अशा विविध माध्यमांमधून तेजश्री प्रधान प्रेक्षकांच्या भेटीला येत असते. तेजश्री प्रधान हिने 'अग्गंबाई सासूबाई' या मालिकेत महत्त्वाची भूमिका साकारली होती. तिची ही भूमिकाही चांगलीच गाजली होती. तसेच तिने 'होणार सून मी या घरची' या मालिकेत जान्हवी ही व्यक्तिरेखा साकारली होती. तिच्या या मालिकेतील भूमिकेचे आजही तिचे कौतुक केले जाते.

# 'ही सतत कुठे ना कुठे धडपडत असते', निसा देवगण

बॉलीवूडचे प्रसिद्ध स्टार कपल अजय देवगण आणि काजोलची मुलगी नीसा सोशल मीडियावर सतत चर्चेत असते. नीसा अद्याप कोणत्याही बॉलीवूड चित्रपटाचा भाग नसली तरी तिने ग्लॅमरच्या दुनियेत स्वतःचे नाव कमावले आहे. अजयच्या लाडक्या मुलीचा ग्लॅमर लुक आणि स्टाइल तिला नेहमी इतरांपेक्षा वेगळी बनवते.नीसा देवगन अनेकदा तिच्या मैत्रिणींसोबत पार्टी करताना दिसते. वीकेंड म्हणजे स्टार मुलांसाठी पार्टीचा दिवस. अशा परिस्थितीत रविवारी संध्याकाळी पुन्हा एकदा नीसा तिच्या मैत्रिणींसोबत पार्टीसाठी आली. यादरम्यान इंटरनेटवर एक व्हिडिओही चांगलाच व्हायरल होत आहे. मात्र, यावेळी नीसाचा ग्लॅमरस लूक नसून यामध्ये ती कारचा दरवाजा उघडून बाहेर पडताना दिसतेय.



# पहिले पाढे पंचावन्न!

## भुवनेश्वर-सूंदरचा भेदक मारा, दिल्लीचा डाव 144 धावांत आटोपला

। चेन्नई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**गुणातालिकेत तळाशी असलेल्या दिल्ली संघाची कामगिरी सर्वसाधारणच राहिली आहे. आजच्या सामन्यातही दिल्लीच्या फलंदाजांनी निराशाजनक कामगिरी केली. डेविड वॉर्नरच्या नेतृत्वातील दिल्ली संघाने निर्धारित 20 षटकात 9 विकेटच्या मोबदल्यात 144 धावांपर्यंत मजल मारली. अक्षर पटेल आणि मनिष पांडे यांचा अपवाद वगळता एकाही फलंदाजाला 30 धावांचा पल्ला पार करता आला नाही. भुवनेश्वर कुमार आणि वॉशिंग्टन सूंदर यांच्या भेदक माऱ्यापुढे दिल्लीच्या फलंदजनी नांगी टाकली. हैदराबादला विजयासाठी 145 धावांचे आव्हान देण्यात आलेय.**

नाणेफेक जिंकून प्रथम फंलदाजी करणाऱ्या दिल्लीची सुरुवात निराशाजनक झाली. फिलिप साल्ट खातेही न उघडता माघारी परतला. भुवनेश्वर कुमार याने साल्ट याला शून्यावर बाद केले. साल्ट बाद झाल्यानंतर कर्णधार डेविड वॉर्नर आणि अष्टपैलू मिचेल मार्श यांनी दिल्लीचा डाव सावरला. ऑस्ट्रेलियन जोडी जमली असे वाटले तेव्हाच नटराजन याने मिचेल मार्श याला बाद केले. मार्श याने 25 धावांचे योगदान दिले.

मार्श बाद झाल्यानंतर वॉर्नर याने सर्फराजच्या साथीने डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण वॉशिंग्टन सुंदर याने एकाच षटकात दिल्लीला तीन धक्के दिले. डेविड वॉर्नर, सर्फराज आणि अमन खान यांना सूंदर याने तंबूत पाठवले.



कर्णधार डेविड वॉर्नर याने 21 धावांचे योगदान दिले. सर्फराज खान याला 10 धावा करता आल्या तर अमन खान चार धावांवर बाद झाला. या तीन विकेट एकाच षटकात पडल्यामुळे दिल्लीच्या फलंदाजीला खिंडार पडले. पण अनुभवी मनिष पांडे आणि अक्षर पटेल यांनी दिल्लीचा डाव सावरला. दोघांनी दिल्लीसाठी लढा दिला.

अक्षर पटेल आणि मनिष पांडे यांनी दिल्लीचा डाव सावरला. दोघांनी संयमी फलंदाजी करत दिल्लीची धावसंख्या वाढवण्याचा प्रयत्न केला. पण भुवनेश्वर कुमार याने अक्षर पटेल याला बोल्ड करत हैदराबादला मोठे यश मिळवून दिले. अक्षर पटेल याने 34 धवांचे योगदान दिले.


### दोघांनी दिला दिल्लीसाठी लढा

» कर्णधार डेविड वॉर्नर याने 21 धावांचे योगदान दिले. सर्फराज खान याला 10 धावा करता आल्या तर अमन खान चार धावांवर बाद झाला. या तीन विकेट एकाच षटकात पडल्यामुळे दिल्लीच्या फलंदाजीला खिंडार पडले. पण अनुभवी मनिष पांडे आणि अक्षर पटेल यांनी दिल्लीचा डाव सावरला. दोघांनी दिल्लीसाठी लढा दिला.


अक्षर पटेल बाद झाल्यानंतर मनिष पांडेही लगेच धावबाद झाला. मनिष पांडे याने 34 धावांचे योगदान दिले. ही जोडी फुटल्यानंतर दिल्लीचा डाव पुन्हा कोसळला. रीपल पटेल, नॉर्खिया स्वस्तात बाद झाले. रिपल पटेल याने पाच धावांचे योगदान दिले. तर नॉर्खिया दोन धावांवर बाद झाला. इशांत शर्मा आमि कुलदीप यादव नाबाद राहिले.

दिल्लीच्या फलंदाजांनी आज पुन्हा एकदा निराशाजनक कामगिरी केली. दिल्लीच्या एकाही फलंजाला अर्धशतक झळकावता आले नाही. दिल्लीकडून फक्त दोन षटकार लगावण्यात आले. तर 15 चौकार लगावण्यात आले. दिल्लीच्या फलंदाजांनी अनेक चेंडू निर्धाव खेळले. हैदराबादच्या गोलंदाजांनी पहिल्यापासूनच अचूक टप्प्यावर मारा केला. मारको जानसेनचा अपवाद वगळता प्रत्येक गोलंदाजांनी धावा रोखल्या. भुवनेश्वर कुमार याने चार षटकात 11 धावा देत दोन विकेट घेतल्या. तर वॉशिंग्टन सूंदर याने चार षटकात 28 धावांच्या मोबदल्यात तीन विकेट घेतल्या. नटराजन याने एक विकेट घेतली.

# धोनीच्या परीसस्पर्शाने अजिंक्य रहाणेचे सोने....

## अजिंक्य रहाणेच्या नावावर आयपीएलमध्ये शतकांची नोंद

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**अजिंक्य रहाणे या नावाची आयपीएलमध्ये सध्या सर्वात जास्त चर्चा आहे. रहाणे धोनीच्या सहवासात गेला आणि 360 डिग्री बदलला... होय... अजिंक्य रहाणेला इतक्या विस्फोटकपणे फलंदाजी करताना याआधी पाहिले नसेल. अजिंक्य रहाणेच्या नावावर आयपीएलमध्ये शतकांची नोंद आहे. पण सध्या राहणे ज्या पद्धतीने खेळतोय.. त्याला सगळे रहाणे 2.0 असेच म्हणत आहे. या आक्रमक खेळीबद्दल रहाणेला विचारण्यात आले तेव्हा अजिंक्य म्हणाला.. "MY BEST IS YET TO COME" अजिंक्य रहाणे याच्या आत्मविश्वासाबद्दल तुम्हाला या वाक्यावरुनच कळत असेल.. अजिंक्यला हा आत्मविश्वास धोनीमुळे आला... अजिंक्यने हे स्वतःला सांगितलेही... धोनीच्या परिस्पर्शाने अजिंक्य रहाणे चमकलाय.....**

गेल्या वर्षी अजिंक्य रहाणे टीम इंडियासोबत दक्षिण आफ्रिका दौऱ्याला गेला होता. या दौऱ्यात टीम इंडियाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर टीम इंडियातून अजिंक्य रहाणेला डच्चू मिळाला. बीसीसीआयने अजिंक्य रहाणेला रणजी सामन्यात खेळायला लावले... रणजीमध्ये परफॉर्म केल्यानंतर टीम इंडियाची दारे उघडली जातील, असा संदेशच अजिंक्य रहाणे बीसीसीआयने दिला. अजिंक्य रहाणेचे उपकर्णधारपद तर गेलेच त्याशिवाय त्याला टीम इंडियातून डच्चूही मिळाला. आयपीएलमध्ये धावा होत नसल्यामुळे कुणी बोली लावली नाही. ज्या रहाणेच्या फलंदाजीचे कौतुक होत होते... त्यालाच खराब फॉर्ममध्ये टीम इंडियातून बाहेरचा रस्ता दाखवला. अजिंक्यमध्ये प्रतिभा प्रचंड आहे.. हे कधीच लपलेले नाही. पण प्रत्येक खेळाडूच्या आयुष्यात बॅट पॅच येतोच... अजिंक्य रहाणेच्या आयुष्यातही आला.. पण त्यावेळी बीसीसीआयने अजिंक्य रहाणेची साथ सोडली... अजिंक्य रहाणे याने रणजी सामन्यात कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधले.. पण सर्वात जास्त चर्चा झाली ती आयपीएलमधील कामगिरीची.. धोनीच्या सहवासात गेलेला रहाणे यंदाचा सर्वाधिक विस्फोटक फलंदाज आहे.

ज्यावेळी चेन्नईने अजिंक्य रहाणे याला 50 लाख रुपयांत खरेदी केले.. ते पुजाराप्रमाणेच आदाराप्रमाणे अजिंक्य रहाणेला खरेदी केले असेल.. असा सर्वांनी अंदाज लावला. पहिल्या दोन सामन्यात अजिंक्य रहाणेला संधी मिळाली नाही. पण वानखेडे मैदानावर धोनीने अजिंक्य रहाणेला मैदानात उतरवले.. अन् इतिहास घडला.... जगभरातील क्रीडा प्रेमींचा रहाणेचे वेगळेच रुप दिसले. अजिंक्य रहाणे याने वानखेडेवर धावांचा पाऊस पाडला. अवघ्या 20 चेंडूत अजिंक्य रहाणे याने अर्धशतक झळकावले. रहाणेच्या या रौद्ररुपाला पाहून सगळेच आश्चर्यचकीत झाले होते. सोशल मीडियावर क्रीडाप्रेमी रहाणेच्या कौतुकाचे पूल बांधत राहिले. सामन्यानंतर अजिंक्यला त्याच्या खेळीबद्दल विचारण्यात आले... तेव्हा अजिंक्य रहाणे याने आपल्या कामगिरीचे गुपीत सांगितले.... एमएस धोनी...

एमएस धोनीने मला खेळण्यासाठी फ्रीडम दिले.. तू तुझा स्वभाविक खेळ कर.. असे धोनीने सांगितल्याचे अजिंक्य रहाणे याने सांगितले... फक्त अजिंक्य रहाणेच नाही तर धोनीच्या सहवासात आलेल्या अनेक क्रिकेटरचे आयुष्य बदलले.. रॉबिन उथप्पा, अंबाती रायडू, शिवम दुबे आणि आता अजिंक्य रहाणे... या सर्वांना धोनीने नवे आयाम दिले.



### आक्रमक अजिंक्य रहाणे

» अजिंक्य रहाणे ज्या पद्धतीने फलंदाजी करतोय... ते याआधी कधीच पाहिले नव्हते.. अजिंक्य रहाणे सध्या 200 च्या स्ट्राईक रेटने धावा जमवतोय.अजिंक्य रहाणे याने 2008 मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. मागील 15 वर्षात अजिंक्य रहाणे याने 30 च्या सरासरीने आणि 121 च्या स्ट्राईक रेटने चार हजार धावा केल्या होत्या. 121 च्या स्ट्राईक रेटने धावा काढणारा अजिंक्य रहाणे आज 200 च्या स्ट्राईक रेटने खेळत आहे. ग्लेन मॅक्सवेल, रोहित शर्मा, आंद्रे रसेल यासारख्या विस्फोटक फलंदाजांपेक्षा जास्त आक्रमक अजिंक्य रहाणे दिसत आहे. धोनीच्या परिस्पर्शाने आपल्याला अजिंक्य रहाणे 2.0 पाहायला मिळत आहे.